**<u>नियमित फौजदारी खटला क्र. १४३३/२०१८</u>**

**<u>महाराष्ट्र शासन वि. शेख अस्लम शेख अकबर</u>**

**<u>निशाणी</u> – ७४**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२**

नाव – राहूल रवी लोखंडे,

वय – ३० वर्ष, व्यवसाय – सेतु केंद्र,

राहणार – गल्ली क्र. ८, दांडगे किराणा जवळ, मिसारवाडी, औरंगाबाद.

**शपथेवर सरतपास फिर्यादी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी.एस. जावळे यांचे मार्फत सुरू –**

१. दि. २१.०३.२०१८ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता ललीता काकडे यांचे घरी कादरीया कॉलनी येथे बोलवले होते. त्यावेळी माझेसोबत दुसरा पंच उपस्थित होता. पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा केला. तो आम्हाला वाचुन दाखवला व तो बरोबर असल्याने मी त्यावर स्वाक्षरी केली. आता मला सदरचा पंचनामा दाखवला. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यास **निशाणी ७५** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटपास आरोपीतर्फे –**

आरोपी व त्याचे विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता ते गैरहजर आहेत. सबब, उलटतपास नाही.

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती.**

Digitally signed by GUNARI SAMEER GOPAL
Date: 2025.04.22 11:29:22 +0530

**दिनांक –२१.०४.२०२५**

**ठिकाणी – औरंगाबाद**

**(समीर गोपाळ गुणारी)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**(न्यायालय क्र.१३), औरंगाबाद**